**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०९ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u>** **-** नितीन पंजाबराव चनकापुरे

**<u>वय</u>** **-** ३८ वर्ष, **<u>पद</u> -** वनरक्षक

**<u>नेमणूक</u>** **-** खापा रेंज, तह. सावनेर, जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>.**

मी दि. १०.१०.२०२४ पासून वनरक्षक या पदावर खापा रेंज येथे कार्यरत आहे. दि. १४.०३.२०२५ रोजी भनगाळा नाला येथे दुपारी ३.०० वाजता चारही पाय कापलेल्या परिस्थितीत एक नर वाघ मृत आढळून आला. मी स्वान पथक बोलावले. मी स्वान पथकाचे हँडलर चौधरी व त्यांच्यासोबत असलेले वनरक्षक यांच्यासोबत नाल्या उत्तर दिशेला गेलो. २५० मिटरच्या जवळपास एक शेकोटी दिसली. ८ बांबुच्या खुंटया दिसल्या. मला सदरच्या खुंटया दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला खुंटया दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्या एम.ओ.क्र. २ वर आहे.

**२.** त्यानंतर आम्ही नाल्याच्या बाजूने गेलो. दक्षिण दिशेला सेंट्रींग तारेचे गुंडाळलेले बंडल आढळून आले. ते मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला ते दाखवण्यात आले. ते तेच आहेत. ते एम.ओ.क्र. ३ वर आहे.

**३.** घटनास्थळाच्या पूर्वेला गजानन बाजनघाटे यांचे शेत, पश्चिमेला बाबाराव ढोकने यांचे शेत, उत्तर व दक्षिणेला भनगळा नाला होता. त्याची जी.पी.एस. रिडिंग २१, ३३, २५, ७८, ५८, १४ अशी होती. मोक्का पंचनामा दुपारी ३.३० वाजता सुरू झाला व सायंकाळी ५.०० वाजता पूर्ण झाला. मला मोक्का पंचनामा दाखविण्यात आला. मला तो दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर

आहे. त्यास **निशाणी क्र. ७५** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. ते विडीओ कॉन्फरेंसिंगद्वारे हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत**

**४.** मी घटनेच्या दिवशी घटनास्थळावर हजर असल्याबाबत तपास अधिकारी यांना कागदपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्वान पथकामुळे कोणताही निष्कर्ष निघाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्वान पथकामुळे ताराचे बंडल सापडल्याबाबत मोक्का पंचनाम्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोक्का पंचनाम्यावर दि. १४.०३.२०२५ रोजीची तारीख टाकून पंचनामा दि. २५.०३.२०२५ रोजी केला. आम्ही श्वान पथकाला घेवून अंदाजे दुपारी ३.०० वाजता आलो. आम्ही श्वान पथकाला घेवून अंदाजे २ तास फिरलो. २ तासाप्रमाणे श्वान पथकासोबत कार्यवाही सायंकाळी ५.०० वाजतापर्यंत संपली. हे म्हणणे खरे नाही की, मोक्का पंचनामा ३.३० वाजता सुरू करून सायंकाळी ५.०० वाजता पूर्ण केला, हे पंचनाम्यामध्ये खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा कार्यालयामध्ये बसून लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा लिहिला आहे व माझ्या सोबत श्वान पथक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, श्वान पथकासोबत फिरतांना माझ्या सोबत दोन पंच नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जंगल परिसरात सायंकाळी ५.०० वाजता थांबू शकत नाही कारण तशी परवानगी नसते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो जंगल परिसर नसून तिथे नाला आहे व ते शेत परिसर आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेत क्रमांक लिहिलेला नाही व शेताचा ७/१२ पंचनाम्यासहीत जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ५०० मिटर परिसर श्वान पथकासोबत फिरलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्वान हे आपल्यापेक्षा ॲक्टीव असते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४.०३.२०२५ रोजी घटनास्थळावर गडलिंगे, शेलार, आडवले व इतर लोक हजर होते परंतु त्यांची सही पंचनाम्यावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सही केलेल्या ठिकाणी सिल नाही. हे म्हणणे

खरे आहे की, बांबुच्या खुंटया व सेंट्रींग तार किती मिटर लांब आहे हे मी पंचनाम्यात लिहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.04 15:35:10 +0530

सावनेर, (एस. एम. गाडे)
दिनांक ०४.०४.२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe